महाराष्ट्र शासन

वनविभाग

जिल्हा निवड समिती मार्फत वनविभागाची रिक्त पदे भरणेबाबत.

अकोला वनविभागातील गट क व ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता जाहीरात क्रमांक ०१/ २०११-१२ दिनांक २४/१०/२०११

वनवृत्त **यवतमाळ** यांचे अधिपत्याखालील अकोला वनविभाग, वन्यजीव विभाग, सामाजिक वनीकरण विभागाअंतर्गत खालील नमुद गट-क व गट-ड लिपीक व शिपाई पदावर नियुक्तीसाठी आवश्यक पात्रता धारण करीत असलेल्या व वनविभागात भरतीसाठी इच्छूक उमेदवारांनी सोबतच्या विहीत नमुन्यातील आपला अर्ज पत्र व्यवहाराकरिता नमुद पुढील पत्यावर दिनांक ५/११/२०११ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत किंवा तत्पूर्वी पोहचतील अशा बेताने पाठवावा.

**पदाचा तपशिल**

अ) लिपीक ( वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड वेतन १९००) एकुण ३ पदे

| प्रवर्ग | एकुण पदे | समांतर आरक्षण | सर्वसाधारण |
|---|---|---|---|
| | | महिला | |
| वि.जा.अ. | ०१ | -- | ०१ |
| भ.ज.क. | ०२ | ०१ | ०१ |

ब) शिपाई ( वेतनश्रेणी ४४४०-७४४०) ग्रेड वेतन १३०० एकुण २ पदे

| प्रवर्ग | एकुण पदे | सर्वसाधारण |
|---|---|---|
| भ.ज.क. | ०१ | ०१ |
| वि.मा.प्र. | ०१ | ०१ |

आवश्यक शैक्षणिक पात्रता :- **अ) लिपीकः-**

१) एस.एस.सी./शालांत परीक्षा उत्तीर्ण

२) टंकलेखन मराठी ३० श.प्र.मि. किंवा इंग्रजी ४० श.प्र.मि.

३) शासन मान्य संगणक प्रशिक्षण कोर्स प्रमाणपत्र

**ब) शिपाईः- ४ थी इयत्ता उत्तीर्ण**

अर्ज स्विकारण्याची प्रक्रिया कार्यक्रम:-

१. दिनांक २४/१०/२०११ ते ५/११/२०११ आवेदन पत्र स्विकारण्याची अंतीम तारीख ५/११/२०११ संध्याकाळी ५.०० वाजेपर्यत
२. लेखी परीक्षा दिनांक २०/११/२०११ वेळ १०.०० वाजता अकोला येथे घेतली जाईल.
३. हॉल तिकीट (प्रवेश पत्र) www.akola nic in या वेबसाईटवर पात्र उमेदवारांना डाऊनलोड करता येईल.

सर्वसाधारण अटी:-

१) लिपीक पदासाठी उमेदवाराचे वय दिनांक ५/११/२०११ रोजी किमान १८ वर्षे आवश्यक असुन कमाल वयोमर्यादा इतर मागासवर्गीय व मागासवर्गीयांसाठी ३८ वर्षे राहील.
२) शिपाई पदासाठी उमेदवाराचे वय दिनांक ५/११/२०११ रोजी किमान १८ वर्षे आवश्यक असुन कमाल वयोमर्यादा इतर मागासवर्गीय व मागासवर्गीयांसाठी ३८ वर्षे राहील.

अ) महिला उमेदवारांकरीता शासन निर्णय २५ मे २००१ नुसार,

खुल्या प्रवर्गातील,उन्नत आणि प्रगत व्यक्ती/कुटुंबातील (क्रिमीलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग,भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील (क्रिमीलेअर) महिला सदस्यांसांना ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

ब) माजी सैनिक उमेदवारांकरीता

१) माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यत शिथील राहील.माजी सैनिकांना आवेदन शुल्क भरण्याची अट लागु राहणार नाही.

क) इतर अटी :-

१) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवास (Domacile) असला पाहीजे.त्याबाबत सक्षम प्राधिका-याचे अधिवास प्रमाणपत्राची प्रत जोडणे आवश्यक आहे.
२) अर्जदाराने अर्जासोबत सर्व प्रमाणपत्राच्या छायाप्रती (झेरॉक्स) साक्षांकित (Attested) करुन जोडाव्यात.तसेच एस.एस.सी./शालांत परीक्षा जेवढया सबंधीत उत्तीर्ण केली त्या प्रत्येक संधीच्या साक्षांकित छायाप्रती जोडाव्यात.मुळ प्रती जोडू नयेत.

३) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयांत नोंदणी केली असल्यांस नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत जोडावी.

४) उमेदवाराने आपले अर्ज उपवनसंरक्षक,अकोला वनविभाग अकोला यांचे कार्यालय जिल्हा सत्र न्यायालयासमोर स्टेशन रोड,अकोला या पत्त्यावर दिनांक ५/११/२०११ सायंकाळी ५.०० वाजेपर्यत किंवा त्यापुर्वी रजिष्टर पोस्टाव्दारे पाठवावे किंवा कार्यालयीन वेळेत शासकिय सुट्टीचे दिवस वगळता उपवनसंरक्षक,कार्यालयांत प्रत्यक्ष सादर करावेत.अर्जाची पोच न चुकता घ्यावी. दिनांक ५/११/२०११ नंतर प्राप्त झालेले कोणतेही अर्ज विचारांत घेतले जाणार नाही.त्याबाबत कोणतीही तक्रार मान्य केल्या जाणार नाही.

५) सदर पदांकरीता खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना अर्जासोबत रु.२००/-( अक्षरी रुपये दोनशे फक्त ) व राखीव प्रवर्गाकरिता उमेदवारांना रु १००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) चा न्यायालयीन फी मुद्रांकाच्या स्वरुपात (कोर्ट फी स्टॅम्प) /धनाकर्ष/पोस्टल ऑर्डर नसल्यांस अर्ज रद्य करण्यांत येईल नंतर कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

६) जाहीरात प्रसिध्द केलेल्या नमुन्यातील अर्जावर फोटो चिकटवुन तो मुख्याध्यापक/प्राचार्य अथवा वर्ग १ किंवा वर्ग २ चे राजपत्रित अधिकारी यांचेकडुन साक्षांकित केलेला असावा.नसल्यांस असा अर्ज स्विकारल्या जाणार नाही अथवा अर्ज रद्य करण्यांत येईल.

७) अर्जदाराला मुलाखतीसाठी उपस्थित राहण्याकरीता कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

८) फक्त याच जाहीरातीला अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहीत कालावधीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारांत घेतले जातील.अन्य कोणत्याही संदर्भातील यापुर्वी प्राप्त झालेले अर्ज विचारात धेतले जाणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.

९) प्रत्येक अर्जदाराने महाराष्ट्र नागरी सेवा नियम (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मध्ये प्रतिज्ञापत्राचा नमुना भरुन अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

१०) शिपाई पदाकरीता शासन निर्णय क्रमांक एमएसआरव्ही/२००४/प्रक्र-१२ दिनांक ७ जुन २००४ नुसार शैक्षणिक पात्रतेच्या इयत्तेत/लेखी परीक्षेत उमेदवारांना मिळालेल्या गुणांव्दारे व तोंडी परीक्षेच्या गुणाव्दारे पात्र उमेदवारांची निवड करण्यांत येईल.

११) आरक्षित मागासवर्गीय उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय नियुक्ती देता येणार नाही.

१२) आरक्षणाच्या पदांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

१३) एका अर्जदाराच्या समांतर आरक्षणानुसार एकच अर्ज ग्राहय धरण्यांत येईल.

१४) आवश्यक शैक्षणिक पात्रता परिपुर्ण नसलेले/अपुर्ण/आवश्यक प्रमाणपत्र सोबत नसलेले अथवा अर्जासोबत आवश्यक रकमेचे न्यायालय फी मुद्रांक (कोर्ट फी स्टॅम्प) /धनाकर्ष (राष्ट्रीयकृत बॅकेचे)/पोस्टल ऑर्डर नसलेले अथवा अर्जावर स्वत:चा फोटो नसलेले अथवा चुकीचे भरलेले अर्ज विचारांत घेतले जाणार नाही व त्याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.अथवा कोणताही पत्रव्यवहार करता येणार नाही.

१५) शिपाई पदाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांना परिक्षा शुल्क भरण्याची आवश्कता नाही.

१६) सदर न्यायालयीन फी मुद्रांकाच्या स्वरुपात (कोर्ट फी स्टॅम्प) /धनाकर्ष (राष्ट्रीयकृत बॅकेचे)/पोस्टल ऑर्डर नसल्यास रद्य करण्यांत येईल. कृपया याबाबतची नोंद घ्यावी.

१७) समांतर आरक्षण हे फक्त सरळसेवा भरतीस लागु राहील.समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणा अंतर्गत असल्याने त्यास सामाजिक आरक्षणावर वाढीव म्हणून गणण्यांत येणार नाही.

१८) सदर जाहीरात ही www.akola.nic.in या अकोला जिल्हयाच्या संकेत स्थळावर पहावयांस मिळेल.

१९) सदरच्या कार्यक्रमामध्ये बदल अथंवा रद्य करण्याचे अधिकार जिल्हा निवड समितीकडे राखुन ठेवण्यांत आलेले आहेत.तसेच वरील रिक्त पदांमध्ये वाढ किंवा घट होण्याची शक्यता असल्यामुळे रिक्त पदांच्या संख्येत झालेल्या बदलाबाबत कोणतीही तक्रार ग्राहय धरण्यांत येणार नाही.

दिनांक :- २१/१०/२०११

ठिकाण:- अकोला

स्वाक्षरी/-
अध्यक्ष
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी
अकोला
.

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञपन) नियम,२००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना-अ

प्रतिज्ञापन
नमुना अ
(नियम ४ पहा)

मी, श्री/श्रीमती/कुमारी . -----------------------------------------------------------------

श्री.---------------------------------------------------------यांचा/यांची/मुलगा/मुलगी/पती,

वय राहणार ------------------- याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१. मी ---------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२. आज रोजी मला -------(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या -------- आहे.(असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यांस पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

उमेदवारांची सही

| कार्यालयीन उपयोगाकरिता | | पात्र | | अपात्र | |
|---|---|---|---|---|---|
| अर्जाचा आवक क्रमांक | | संगणक नोंदणी क्रमांक | | | |

अर्जाचा नमुना

**लिपीक/शिपाई पदासाठी अर्ज**

| |
|---|
| उमेदवारांचा मुख्याध्यापक/ प्राचार्य अथवा राजपत्रित अधिकारीद्वारे साक्षांकित अलीकडील पासपोर्ट आकाराचा फोटो |

प्रति,

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती अकोला.

विषय :- लिपीक /शिपाई पदासाठी विनंती अर्ज.

संदर्भ :- दैनिक .----------------------- या वृत्तपत्रातील जाहीरात दिनांक

आपले कार्यालयाची दैनिक वर्तमानपत्रात नमुद जाहीरातीनुसार मी लिपीक/शिपाई पदाकरिता अर्ज सादर करीत आहे.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | संपूर्ण नांव | | | | | | | | |
| २ | पत्र व्यवहाराचा पत्ता | (आडनांव प्रथम नंतर स्वत:चे नांव व शेवटी वडिलांचे /पतीचे नांव | | | | | | | |
| ३ | जन्मतारीख | दिवस | | | महिना | | | वर्ष | |
| | | | | | | | | | |
| ४ | दिनांक ५/११/२०११ रोजीचे वय | दिवस | | | महिना | | | वर्ष | |
| | | | | | | | | | |
| ५ | जातीचा प्रवर्ग वर्गवारी (खालील चौकनात अशी खुण करावी) | अजा. | अ.ज. | विजाअ | भजक | भजड | विमाप्र | इमाव | खुला |
| | | | | | | | | | |
| ६ | समांतर आरक्षणाचा प्रकार खालील चौकणात ( ) अशी खुण करावी. | महिला | माजी सैनिक | अल्पदृष्टी | कर्णबधीर | सर्वसाधारण | | | |
| ७ | लिंग | पुरुष | | | | महिला | | | |
| ८ | राष्ट्रीयत्व | | | | | | | | |
| ९ | महाराष्ट्राचा मुळ रहिवासी आहे काय?(Domical) | होय/नाही | | | | | | | |
| १० | उन्नत व प्रगत गटात मोडतो/ मोडते काय (असल्यास प्रमाणपत्र जोडावे) | होय/नाही | | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| ११ | लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे काय? | होय/नाही |

१२ अर्जदाराची शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | शैक्षणिक पात्रता | उत्तीर्ण वर्ष | शालांत परिक्षा /बोर्ड/विद्यापीठ | शाळेचे नांव | एकुण गुण | प्राप्तगुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |

१३. संगणक अर्हता

१४. इतर पात्रता

१५. परिक्षा फी --न्यायालय फी मुद्रांक (कोर्ट फी स्टॅम्प) /धनाकर्ष (राष्ट्रीयकृत बॅकेचे)/पोस्टल ऑर्डर

रुपये-----------क्रमांक--------------दिनांक-----------२०११-१२ बॅकेचे नांव-----------१६. वर नमुद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचुक आहे. मी लिपीक/शिपाई पदासाठी अर्ज सादर करीत आहे. सदर पदासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण केली आहे. ही खात्री करुनच अर्ज सादर करीत आहे. मी असेही प्रमाणित करतो की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास नोकरी गमविण्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या कायदेशिर कारवाईस मी पात्र व बांधील राहील याबाबत माझी कोणतीही हरकत राहणार नाही.

ठिकाण:-

अकोला:-

अर्जदाराची स्वाक्षरी